**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २५ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

- **राज्य विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं अंतिम आठवडा चर्चेला उत्तर.**
- **नागपूरच्या एनएफएससी आणि चंद्रपूर वन अकादमी यांच्यात सामंजस्य करार, जंगलातील वणवा व्यवस्थापनासाठी करणार संयुक्त प्रयत्न.**
- **राज्याच्या विविध भागात उष्णतेच्या तीव्रता वाढ,सार्वजनिक आरोग्य विभागानं नागरिकांना दिला खबरदारीचा इशारा.**
- **सेलू ते सिंदी दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाचे काम पूर्ण, 27-28 मार्च रोजी सीआरएस निरीक्षण आणि वेग चाचणी होणार.**
- **'ऑरेंज सिटी आरोग्य चित्रपट महोत्सव' येत्या 29 आणि 30 मार्च रोजी, पद्मश्री डॉ.प्रकाश आमटे यांच्या हस्ते होणार उद्घाटन.**

**आता सविस्तर बातम्या** .......

अंतिम आठवडा प्रस्ताव

विधासभेत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर दिलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांविरोधात अपशब्द वापरणाऱ्या कोरटकर याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं. कोविड काळात कैद्यांची मुक्तता आणि गुन्हेगारी बाबत फडणवीस यांनी भाष्य केल.

***आता कोविडच्या काळामध्ये १० हजारावर कैद्याची मुक्तता केली, यातले ७२ कधी परतलेच नाही आणि त्यानंतर आता लक्षात येत आहे, कि अनेक गुन्ह्यांमध्ये ते आरोपी म्हणून सापडत आहे. ८ लोकं तर मोकाचे आरोपी सापडले कि ज्यांनी पुन्हा त्याठिकाणी येऊन गुन्हे केले. काही ग्यांगचे सदस्य झाले आणि म्हणून मला असं वाटते कि गुन्हेगाराच्या संदर्भात आपण मानव अधिकाराच हनन होणार नाही हे बघितल पाहिजे, पण फार संवेदना दाखवून त्या ठिकाणी त्याचा काही उपयोग होतो असं मला वाटत नाही.***

राज्यात हुक्का पार्लरचं वाढतं प्रस्थ रोखण्यासाठी यासंदर्भातल्या कायद्यात सुधारणा करण्याची घोषणा मुख्यमंत्री  त्यांनी केली. हा गुन्हा दखलपात्र केला जाणार असल्याचं ते म्हणाले. याशिवाय दुसऱ्यांदा हुक्का पार्लर सापडलं तर संबंधित उपहारगृहाचा परवाना  आधी सहा महिन्यांसाठी निलंबित केला जाईल तर तिसऱ्यांदा हुक्का पार्लर सापडलं तर परवाना कायमस्वरूपी रद्द केला जाईल असं त्यांनी सांगितलं. सहकारी उपनिबंधक कार्यालयातला भ्रष्टाचार रोखण्यासाठी सर्व कामकाज डिजिटल केलं जाणार आहे, त्यासंबंधी आधी तीन आणि नंतर सहा महिन्यात संबंधीत कार्यवाही पूर्ण केली जाणार असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली.  राज्यातील शहरांमधल्या नद्यांच्या पूरपातळी संदर्भातल्या निळ्या आणि लाल रेषांचं समिती स्थापन करून तातडीनं पुन्हा सर्वेक्षण करण्याचं आश्वासन प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज एका लक्षवेधीच्या उत्तरात विधानसभेत दिलं. या रेषेत येणाऱ्या जमिनीवर अवैधरित्या विकासकामांची परवानगी दिली असेल तर ती रद्द करून संबंधित व्यक्तीवर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

अंबादास दानवे/कामरा/विधान परिषद

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली असून, सरकारच्या निष्क्रियतेमुळे गुन्हेगारीला चालना मिळत असल्याचा आरोप, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज विधानपरिषदेत केला. आज अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना त्यांनी, सरकारच्या कार्यपद्धतीचा निषेध केला.  दरम्यान, हास्य कलाकार कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या वक्तव्याबद्दल माफी मागण्यास नकार दिला आहे. यासंदर्भात एक पत्रक जारी करुन त्यांनी, स्टुडिओची तोडफोड केल्याच्या घटनेचाही निषेध केला आहे.

सामंजस्य करार

जंगलातील वणवा प्रतिबंधक आणि व्यवस्थापन धोरणांच्या आखणीच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, नागपूरच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी) आणि चंद्रपूर वन प्रशासन, विकास आणि व्यवस्थापन अकादमी, चंद्रपूर (सीएफए) यांच्यात काल  सामंजस्य करार (एमओयू) झाला. एनएफएससीचे संचालक एन.बी. शिंगणे आणि सीएफएचे संचालक एम. श्रीनिवास रेड्डी यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.  या सामजंस्य कराराचा प्रमुख उद्देश जंगलातील वणवा प्रतिबंधन, व्यवस्थापन आणि प्रतिसाद

या महत्त्वाच्या क्षेत्रात प्रशिक्षण, कौशल्याची देवाणघेवाण आणि संशोधन कार्यक्रमांना बळकटी देणे आहे, असे एन. बी. शिंगणे यांनी सांगितले.

WAVES Anime & Manga

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सहकार्याने, मीडिया अँड एंटरटेनमेंट असोसिएशन ऑफ इंडिया नागपूरमध्ये WAVES Anime & Manga Contest स्पर्धा घेण्यात येत आहे. क्रिएट इन इंडिया उपक्रमांतर्गत भारताच्या क्रिएटर इकॉनॉमीला चालना देण्याचे आणि वेबटूनमधील स्थानिक प्रतिभेला प्रोत्साहन देणे हे या कार्यक्रमाचे उद्‌देश्य आहे. हा कार्यक्रम आज नागपूरच्या जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे संपन्न होत असून सध्या पुरस्कार वितरण होत आहे.

उष्णतेची तीव्रता

राज्याच्या विविध भागात उष्णतेची तीव्रता वाढत असून उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागानं नागरिकांना खबरदारीचा इशारा दिला आहे. आरोग्य विभागानं सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष सुरू केले आहेत. सर्व जिल्हा आणि महापालिका स्तरांवरील साथरोग वैद्‌यकीय अधिकाऱ्यांना उष्माघात विषयक प्रशिक्षण देण्यात आलं आहे. राज्यात २१ मार्चपर्यंत उष्माघाताचे २१ रुग्ण आढळून आले आहेत.

मध्य रेल्वे

मध्य रेल्वे नागपूर विभागाने सेलू ते सिंदी दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. 18 किमी लांबीच्या या नव्या रेल्वे मार्गामुळे रेल्वे वाहतुकीची कार्यक्षमता वाढेल, परिचालन क्षमता सुधारेल आणि प्रवासी तसेच मालगाड्‌यांच्या हालचाली अधिक सुकर होतील. या संदर्भात, रेल्वे सुरक्षा आयुक्त येत्या 27 आणि 28 मार्च 2025 रोजी या नव्या रेल्वे मार्गाचे निरीक्षण आणि वेग चाचणी घेणार आहेत. या वेग चाचणीद्‌वारे नव्या रूळांच्या सुरक्षितता आणि कार्यक्षमतेची तपासणी केली जाईल, तसेच ते सुरक्षित रेल्वे वाहतुकीच्या आवश्यक निकषांना पूरक आहेत की नाही, याची खातरजमा केली जाईल. या अतिरिक्त रेल्वे मार्गांच्या पूर्णतेमुळे सध्याच्या रेल्वे मार्गांवरील वाहतूक कमी होईल, विलंब कमी होतील आणि या परिसरातील रेल्वे सेवा अधिक सुकर होईल.

ऑरेंज सिटी आरोग्य चित्रपट महोत्सव’

ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनन, पी.एम.शाह फाउंडेशन पुणे, नागपूर महानगरपालिका, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, सिनेमोंताज आणि सप्तक यांच्या सहकार्याने 29 व 30 मार्च 2025 रोजी 'ऑरेंज सिटी आरोग्य चित्रपट महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. आरोग्य समस्यांबाबत जागृती करणे आणि प्रतिबंधात्मक उपाय लोकांपर्यंत पोहोचवणे, हा महोत्सवाचा मुख्य उद्देश असल्याचे ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. आरोग्य विषयावर आयोजित होणारा हा मध्य भारतातील पहिलाच चित्रपट महोत्सव ठरणार आहे. कविकुलगुरु कालिदास सभागृह, पर्सिस्टंट सिस्टम्स, आयटी पार्क, गायत्री नगर, नागपूर येथे होणा-या या महोत्सवाचे उद्घाटन शनिवार, 29 मार्च रोजी दुपारी 12:30 वाजता पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांच्या हस्ते होईल. यावेळी पी. एम. शाह फाउंडेशन पुणेचे संचालक ॲड. चेतन गांधी यांची प्रमुख उपस्थिती राहील.

स्टेट बँक ऑफ इंडिया

स्टेट बँक ऑफ इंडिया, प्रशासकीय कार्यालय, नागपूर आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वे (नागपूर विभाग) यांनी नुकताच वेतन खात्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. एसबीआयच्या रेल्वे सॅलरी पॅकेजचे आकर्षक फायदे करारामध्ये तपशीलवार वर्णन केले आहेत. यामध्ये एक कोटीचा वैयक्तिक अपघात विमा, १.६० कोटींचा हवाई अपघात विमा, सवलतीचे गृहकर्ज, कार कर्ज आणि रुपे डेबिट कार्ड इत्यादी विविध जीवनशैली लाभांचा समावेश आहे.

हवामान

विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान अकोला येथे 40 पूर्णांक 2 अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं तर त्या पाठोपाठ चंद्रपूर इथं 39 पूर्णांक 8 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. नागपुरात आज 37. 6 इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. दरम्यान आगामी चार ते पाच दिवस हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिला आहे.

कुष्ठरोग

कुष्ठरोग हा आजार सर्वांसाठीच मोठे आव्हान आहे. कुष्ठरुग्णांसाठी शासनाच्या विविध योजना सुरु आहेत. अशात कुष्ठरुग्णांचा शोध घेऊन त्यांना उपाचाराखाली आणणे आणि शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आरोग्य विभागाचे उद्दिष्ट आहे. कुष्ठरोग निर्मूलनासाठी मनपा, अधीक्षक नागरी कुष्ठरोग पथक (SULU), शासकिय व खासगी डॉक्टर्स या सर्वांनी समन्वयाने काम करण्याची

गरज आहे, असे प्रतिपादन नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी केले. मनपा मुख्यालयातील सभागृहामध्ये सोमवारी काल वैद्यकीय अधिकारी व खासगी डॉक्टर्स करिता राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. सेलोकर बोलत होते.

अवैध जनावर वाहतूक

भंडारा जिल्ह्याच्या पवनी इथून काल रात्रीच्या सुमारास अवैधरित्या जनावर वाहतूक करणारे वाहन स्थानिक गुन्हे शाखेला आढळले. पोलिसांनी झडती घेतल्यावर जनावरं आढळून आली. या वाहनांमधील 14 जनावरांची सुटका केली असून तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

******